## मराठवाडा मित्र मंडळाचे कॉलेज ऑफ कॉमर्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४

संदर्भ क्र.: एमएमसीसी/ शिष्यवृत्ती व फ्रीशिप/२०२०-२०२१/९८० — २८ डिसेंबर, २०२०

### नोटीस

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप व फ्रीशिप सन २०२०-२०२१ करीता FRESH तसेच RENEWAL चे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणे बाबत

कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व पात्र मागासवर्गीय विद्यर्थ्यांना सूचित करण्यात येते कि, जे विद्यार्थी **अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव** संवर्गातील असून, शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप साठी पात्र आहेत. अश्या विद्यार्थ्यांनी **FRESH तसेच RENEWAL** चे अर्ज http://www.mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. सर्व पात्र नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी New Applicant Registration करून स्वतःचे UserID आणि Password तयार करावे. नवीन तयार केलेला UserID आणि Password हा कायमस्वरूपी लागणार असल्या कारणाने त्याची योग्य अशी नोंद करून ठेवावी.

**चालू शैक्षणिक वर्षात माहिती भरत असताना कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी M.M.C.C. COLLEGE (२७२५१४०१५२८) असे महाविद्यालयाचे नाव निवडावे. तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील विध्यार्थ्यांनी Marathwada Mitra Mandal's College of Commerce (३४८९) असे महाविद्यालयाचे नाव निवडावे. व फी भरल्याबाबतच्या रकान्यात ०.०० (शून्य रुपये) असे नमुद करावे.**

**RENEWAL करीत असताना Online दिलेल्या सूचना काटेकोरपणे वाचून त्याप्रमाणे Profile Update करावा, उदाहरणार्थ चालू शैक्षणिक वर्ष तसेच इतर आवश्यक ते बदल करूनच, अर्ज मागील (२०१९-२०२०) वर्षी लागू केलेल्या शिष्यवृत्तीस (Scholarship) अथवा फ्रीशिपसाठी (Freeship) पुनःश्च लागू करावा.**

शिष्यवृत्ती (Scholarship) साठी उत्पन्न मर्यादा **व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव करीता रु. १,००,०००/-** असून, **अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी रु. २,५०,०००/-** इतकी आहे. तसेच फ्रीशिप (Freeship) अनुसूचित जाती (BBA/BCA/BBM-IB/B.Sc(CS) अभ्यासक्रमा व्यतिरिक्त) /अनुसूचित जमाती साठी उत्पन्न मर्यादा नसून, **BBA/BCA/BBM-IB/B.Sc(CS) च्या अनुसूचित जाती (SC) विद्यार्थ्यांना फ्रीशिप लागू नाही. व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव साठी ची उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/-** इतकी आहे. तसेच **BBA/BCA/BBM-IB अभ्यासक्रमाकरीता व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव संवर्गातील विद्यार्थ्यांना कुठल्याही शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप चा लाभ घेता येणार नाही** याची सर्वांनी कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | ऑनलाईन भरलेल्या अर्जाची साक्षांकित प्रत |
| २. | १० वी, १२ वी उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| ३. | मागील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| ४. | १० वी /१२ वी/ग्रॅज्युएशन पदवी सोडल्याचा दाखला (झेरॉक्स) |
| ५. | डोमेसाइल सर्टिफिकेट (झेरॉक्स) |
| ६. | जातीचा दाखला (झेरॉक्स) |
| ७. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०१९-२०२० चा तहसीलदारचा दाखला ( उत्पन्न मर्यादा वर नमूद केल्याप्रमाणे) (Original) |
| ८. | आधार कार्ड (झेरॉक्स) |
| ९. | राशन कार्ड (झेरॉक्स) |
| १०. | बँक पासबुक (झेरॉक्स) |
| ११. | चालू शैक्षणिक वर्षाची फी भरल्याची पावती (झेरॉक्स) अथवा महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट |
| १२. | चालू वर्षाकरीता पालकांचे अपत्यांबाबतचे स्वयं घोषित प्रमाणपत्र (Original) |

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतःचा मोबाइल नंबर व बचत खाते हे त्वरित आधारकार्डशी संलग्नित करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यांची शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच ऐकावेळेला एकच शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्याला घेता येईल. अर्ज भरताना कुठलीही अडचण येत असल्यास महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागास संपर्क साधावा.

वरील अर्ज अचूक भरून वरील कागदपत्रांसोबत (नमूद केलेल्या क्रमानुसार) व भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासोबत महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात जमा करावा अथवा अर्जाची प्रत इतर सर्व आवश्यक कागदपत्रांसोबत एकत्रित एकाच PDF मध्ये scholarship@mmcc.edu.in या ईमेल वर पाठवावी.

जो पर्यंत महाविद्यालयास स्कॉलरशिप अर्ज व इतर कागदपत्रे हि ईमेल द्वारे अथवा व्यक्तिशः जमा केले जात नाही तो पर्यंत महाविद्यालयाकडून Online Portal वर अर्जाची छाननी केली जाणार नाही. तसेच अद्याप MAHADBT पोर्टल वर अर्ज भरण्याची अंतिम तारीख महाविद्यालयास प्राप्त झालेली नसून, ती प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल व त्यानुसार मुदतीत भरलेल्या प्राप्त अर्जांवरच महाविद्यालय स्तरावरून कार्यवाही केली जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्राचार्य**

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

प्रत: १. सर्व शाखा प्रमुखांना विद्यार्थ्यांना सूचित करण्यासाठी

**सोबत: RENEWAL करण्याबाबची कार्यपद्धती जोडली आहे.**

Scanned with CamScanner